**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार**

**तक्रार क्रमांक : १२०३/२०२२**

**तक्रारकर्ता,** श्री.दत्ताराम कृष्णा पेडामकर,
घर नं. २६९५, वीर सावरकर नगर,
वैशाली सोसायटी जवळ, वार्ड क्र.५,
वांगणी (प), ता.अंबरनाथ, जि.ठाणे ४२१ ५०३.

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय वांगणी, ता.अंबरनाथ, जि.ठाणे ४२१ ५०३.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय वांगणी, ता.अंबरनाथ, जि.ठाणे ४२१ ५०३.

**तक्रार सुनावणीचा दिनांक : १/१२/२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज प्राप्त दिनांक | प्रथम अपिल आदेश प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| ४/१/२०२२ | ---- | ७/२/२०२२ | २१/२/२०२२ |

तक्रारकर्ता यांनी दि.६/५/२०२२ रोजीच्या अर्जान्वये " माहिती दिली नाही " असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक १/१२/२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. तसेच तत्कालिन व विद्यमान जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत)

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

" *दि.३१.१२.२०२१ रोजीच्या अर्जासोबत दि.२६.११.२०२१, १३.११.२०२१, ६.१०.२०२१, ३०.०८.२०२१ चे अर्ज जोडून दिले त्यावर केलेली कार्यवाहीची त्यावर घेतलेले ठराव, मंजूर केलेला प्रस्ताव, मिनीटस बूकात घेतलेली नोंद, संबंधित विभागामध्ये वर्ग प्रती अथवा प्रस्ताव यांची संपूर्ण प्रती देण्यात यावी व इतर* "

तद्नंतर तक्रारकर्ता यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील दाखल केले.

तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपीलावर तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि.२१/२/२०२२ रोजी, "*अपिलकार यांनी मागीतलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक यांनी विहीत मुदतीत दिलेली नाही. त्यामुळे मागीतलेली माहिती सात दिवसात विनाशुल्क अर्जदार यांना देण्यात यावी.*" असा निर्णय दिलेला आहे.

उभयपक्ष सुनावणीस अनुपस्थित आहेत. उपलब्ध कागदपत्रांवरून दिसून येते की, तत्कालिन जन माहिती अधिकारी यांनी विहीत मुदतीत तसेच प्रथम अपील आदेशानंतर देखील माहिती दिलेली नाही.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी **तक्रारकर्ता यांना १५ दिवसात जलद टपालाने नि:शुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर तक्रारकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.
२. तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत वांगणी (दि.४/१/२०२२ व दि.२१/२/२०२२ रोजी कार्यरत असलेले) यांनी तक्रारकर्ता यांच्या दिनांक ४/१/२०२२ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहीत मुदतीत तसेच प्रथम अपील आदेशानंतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५

अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रतिदिन रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी पुढील सुनावणीच्या वेळी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३. प्रस्तुत प्रकरणाची पुढील सुनावणी दि.१२/१/२०२६ रोजी दुपारी २.०० वाजता होईल.

**सही/-**
**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १ डिसेंबर, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत वांगणी (दि.४/१/२०२२ व दि.२१/२/२०२२ रोजी कार्यरत असलेले) - **यांना प्रत** गट विकास अधिकारी,
पंचायत समिती अंबरनाथ,
ता.अंबरनाथ जि.ठाणे **यांचेमार्फत रवाना.** (गट विकास अधिकारी यांनी सदर आदेशाची प्रत तात्काळ तत्कालिन जन माहिती अधिकारी यांना बजावून पोहोच आयोगास सादर करावी.)

## विवेचन

उपरोक्त आदेशानुसार सदर प्रकरणाची पुढील सुनावणी आज रोजी आयोजित करण्यात आली.

सदर सुनावणीस उभयपक्ष अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत)

तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.सुधीर चिराटे यांनी आयोगास असे कळविले की, त्यांची उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील कामी क्षेत्रिय अधिकारी म्हणून नियुक्ती झाल्याने त्यांना आज सुनावणीस उपस्थित राहता येत नाही. सबब सदर प्रकरण पुढील तारखेस ठेवण्यात येत आहे. पुढील तारखेस तत्कालिन जन माहिती अधिकारी लेखी खुलासा सादर करावा.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

## आदेश

१. तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.सुधीर तुकाराम चिराटे, ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत वांगणी यांनी आयोगाने दि.१/१२/२०२५ रोजीच्या आदेशात निर्देशित केलेप्रमाणे पुढील सुनावणीस लेखी खुलासा सादर करावा.

२. प्रस्तुत प्रकरणाची पुढील सुनावणी दि.२६/२/२०२६ रोजी दुपारी २.०० वाजता होईल.

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १२ जानेवारी २०२६

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.सुधीर तुकाराम चिराटे,
ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत वांगणी
ता.अंबरनाथ, जि.ठाणे ४२१ ५०३.